RNI NO. MAHMAR/25/A3029

दैनिक महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

लातूर

वर्ष : ७ वे, अंक नं. : २८

दि. १७ मे २०२६, वार : रविवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990

# देशाच्या परकीय चलनसाठ्यात ६० हजार कोटींची वाढ!

## पंतप्रधान मोदींनी देशवासीयांना केलेल्या आवाहनाचा सकारात्मक परिणाम

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या काटकसरीच्या आवाहनाचे सकारात्मक परिणाम दिसू लागले असून, रिझर्व्ह बँकेने जारी केलेल्या ताज्या आकडेवारीनुसार, देशाच्या परकीय चलन साठ्यात ६ अब्ज डॉलर्सहून अधिक, म्हणजेच तब्बल ६० हजार कोटी रुपयांची घसघशीत वाढ झाली आहे. विशेष म्हणजे, सलग दोन आठवड्यांच्या घसरणीनंतर हा साठा पुन्हा एकदा वधारला आहे.

काही दिवसांपूर्वीच पंतप्रधान मोदी यांनी देशवासीयांना पेट्रोल-डिझेल, खाद्यतेल आणि सोने-चांदीचा वापर मर्यादित ठेवण्याचे तसेच परदेशी दौरे टाळण्याचे आवाहन केले होते. देशाचा परकीय चलन आणि सोन्याच्या रूपातील खजिना सुरक्षित राहावा, हा त्यामागील मुख्य हेतू होता. सरकारच्या या धोरणात्मक प्रयत्नांचा सकारात्मक परिणाम आता आकडेवारीतून स्पष्टपणे दिसू लागला आहे.

**गेल्या आठवड्यात झाली होती घसरण**

आधीच्या आठवड्यात भारताच्या एकूण परकीय चलनसाठ्यात ७.७९ अब्ज डॉलरची घट झाली होती आणि साठा ६९०.६९ अब्ज डॉलरवर आला होता; मात्र त्यानंतरच्या आठवड्यात पुन्हा मोठी वाढ नोंदवण्यात आली आहे. विशेष म्हणजे, २७ फेब्रुवारी रोजी संपलेल्या आठवड्यात भारताचा परकीय चलन साठा विक्रमी ७२८.४९ अब्ज डॉलरवर पोहोचला होता. त्यानंतर पश्र्चिम आशियातील तणाव आणि रुपयावर वाढलेल्या दबावामुळे रिझर्व्ह बँकेला डॉलर विकून बाजारात हस्तक्षेप करावा लागला होता. त्यामुळे साठ्यात घट दिसून आली होती.



आरबीआयच्या माहितीनुसार, परकीय चलन साठ्यातील सर्वात मोठा घटक असलेल्या फॉरिन करन्सी असेटमध्येही (एफसीए) वाढ झाली आहे. ८ मे रोजी संपलेल्या आठवड्यात एफसीएमध्ये ५६२ दशलक्ष डॉलरांची वाढ होऊन ती ५५२.३८ अब्ज डॉलरांवर पोहोचली. यामध्ये युरो, पाऊंड, येन यांसारख्या नॉनअमेरिकन चलनांच्या मूल्यातील चढ-उतारांचाही परिणाम समाविष्ट असतो.

**सोन्याच्या साठ्यात मोठी वाढ**

देशाच्या सुवर्णसाठ्यातही मोठी वाढ झाली आहे. आरबीआयच्या आकडेवारीनुसार, आठवडाभरात सोन्याच्या साठ्याचे मूल्य ५.६३ अब्ज डॉलरनी वाढून १२०.८५ अब्ज डॉलरवर गेले आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडे भारताची राखीव स्थितीही १२ दशलक्ष डॉलरनी वाढून ४.८७ अब्ज डॉलरवर पोहोचली आहे.

**अर्थव्यवस्थेला उभारी मिळण्याचे संकेत**

परकीय चलन साठ्यातील वाढ ही भारतीय अर्थव्यवस्थेस उभारी मिळण्याचे संकेत मानले जात आहेत. परकीय चलन साठा भक्कम असल्यास आयात खर्च नियंत्रित ठेवणे, रुपयावरील दबाव कमी करणे आणि जागतिक आर्थिक संकटांचा सामना करणे देशासाठी सोपे होते.

## मनोज जरांगे पुन्हा करणार आमरण उपोषण, राज्यभर आंदोलन पेटणार

**जालना/प्रतिनिधी :** मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून पुन्हा एकदा आक्रमक झाले आहेत. त्यांनी राज्यभर आंदोलनाची घोषणा केली आहे. आज सकाळी त्यांनी आंतरवाली सराटीत पत्रकार परिषद घेत आंदोलन करण्याचा इशारा दिला होता. त्यांनी सरकारकडे काही मागण्या केल्या होत्या. तसेच मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र वितरीत करण्याची मागणी केली होती.



या पत्रकार परिषदेनंतर मराठा सम न्वयक समितीची बैठक पार पडली. या बैठकीनंतर जरांगे यांनी आंदोलनाची तारीख जाहीर केली आहे. ३० मे पासून आपण आमरण उपोषण करणार आहे. तसेच राज्यभरात शांततेत आंदोलन करण्याची भूमिका त्यांनी जाहीर केली आहे. यामुळे आता सरकारसमोरील अडचणी वाढण्याची शक्यता आहे. आंदोलन सुरू व्हायच्या आधी सरकारने आंदोलनाबाबत योग्य ती कार्यवाही करावी. एकदा आंदोलन छेडलं तर पुन्हा माघार घेणार नाही. आपण कुणाचंही ऐकणार नाही, अशी थेट भूमिका जरांगे यांनी घेतली आहे. यावेळी म नोज जरांगे यांनी विविध मागण्या केल्या आहे. सरकारने मराठा आरक्षणाबाबतची उपसमिती बरखास्त करावी. ही समिती काहीही काम करत नाही, आरक्षणासाठी नवीन समिती स्थापन करा. हैदराबाद गॅझेटनुसार मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्राचं वाटप थांबलं आहे. ते पुन्हा सुरू करा. ११९४ च्या धर्तीवरच आम्हाला जीआर हवा आहे. ३० तारखेला सरकारला गुडघ्यावर आणणार, अशा शब्दात जरांगे यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. सरकारला अल्टिमेटम देताना मनोज जरांगे म्हणाले की, सरकारने ३० तारखेच्या आत म राठा आरक्षणाबाबतच्या सर्व मागण्या मान्य कराव्यात. ३० तारखेनंतर सरकारसाठी वेळ वाढवून देणार नाही. सातारा, पुणे आणि कोल्हापूर संस्थानाचं गॅझेट सरकारने लागू करावं. तसेच मराठा आंदोलकांविरोधात दाखल केलेले गुन्हे तत्काळ मागे घ्यावेत. एकही योजना बंद झालेली आम्ही खपवून घेणार नाही, अशी आक्रमक भूमिका जरांगे यांनी घेतली आहे.

## मान्सून अंदमान-निकोबारच्या बेटांवर पोहोचला, हवामान खात्याकडून महत्त्वाची अपडेट



**मुंबई/प्रतिनिधी :** भीषण उकाड्याने आणि वाढत्या तापमानाने हैराण झालेल्या नागरिकांसाठी अत्यंत दिलासादायक आणि आनंदाची बातमी समोर आली आहे. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, नैऋत्य मान्सूनने भारतात अधिकृतरीत्या पाऊल ठेवले असून तो अंदमान आणि निकोबार बेटांवर दाखल झाला आहे. मान्सूनने अंदमान समुद्रासह बंगालच्या उपसागराचा काही भाग व्यापला असून, श्री विजय पुरमसह अंदमान बेटांमध्ये जोरदार पावसाची नोंद झाली आहे.

हवामान खात्याच्या माहितीनुसार, सध्या अंदमान परिसरात ताशी ३५ ते ४५ किलोमीटर वेगाने पश्चिम कडील वारे सक्रिय झाले आहेत. पुढील ३ ते ४ दिवसांत मान्सून आणखी पुढे सरकण्यासाठी अत्यंत अनुकूल आणि पोषक वातावरण निर्माण झाले आहे. आग्नेय अरबी समुद्र आणि पूर्व-मध्य बंगालच्या उपसागरात मान्सूनची प्रगती वेगाने अपेक्षित आहे. यंदा नैऋत्य मान्सून वेळेआधीच केरळात दाखल होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. सामान्यत: १ जूनच्या सुमारास पोहोचणारा मान्सून यंदा २६ मे रोजीच केरळ किनारपट्टीवर धडकू शकतो. बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र अधिक सक्रिय झाल्याने मान्सूनचा वेग वाढला आहे. यंदा मान्सूनच्या सुरुवातीच्या टप्प्यात बंगालच्या उपसागरात किंवा अरबी समुद्रात कोणतेही चक्रीवादळ निर्माण झालेले नाही. त्यामुळे मान्सूनच्या प्रवासात कोणताही मोठा अडथळा येणार नसून तो सुरळीत पुढे सरकणार असल्याचे हवामान विभागाने म्हटले आहे. तसेच, मान्सून ५ जूनपर्यंत गोव्यात दाखल होण्याची शक्यता असून ६ जूनपर्यंत तो कोकणात पोहोचू शकतो. तसेच ७ जूनपर्यंत पुण्यात मान्सून दाखल होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

मान्सून अंदमानात दाखल झाला असतानाच, ईशान्य भारत आणि दक्षिण भारतातील काही राज्यांमध्ये पुढील ४ ते ५ दिवस मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. तामिळनाडू, केरळ, पुदुचेरी आणि दक्षिण कर्नाटकात जोरदार पाऊस होऊ शकतो. दुसरीकडे मात्र, उत्तर-पश्चिम, पश्चिम आणि मध्य भारतात अद्यापही उष्णतेची तीव्र लाट कायम असल्याचे पाहायला मिळत आहे.

## भररस्त्यात तरुणीने थोबाडीत मारली, अपमान सहन न झाल्याने तरुणाने जीवन संपवले; बीडमधील धक्कादायक घटना

**बीड/प्रतिनिधी :** बीड जिल्ह्यातील मोहा येथे अत्यंत धक्कादायक आणि मन हेलावून टाकणारी घटना समोर आली आहे. एका तरुणीनं भररस्त्यात सर्वासमक्ष थोबाडीत मारल्याने झालेला अपमान सहन न झाल्याने एका तरुणाने गळफास घेऊन जीवन संपवल्याची घटना घडली. या घटनेम ुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून तरुणाच्या मृत्यूपूर्वी वडिलांना केलेल्या फोनमुळे प्रकरण अधिकच गंभीर बनले आहे.

मृत तरुणाचे नाव चंद्रहार राजेभाऊ शिंदे असं आहे. १३ मे रोजी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास गावातीलच एका तरुणीने करेवाडी रोडवरील लाल माती परिसरात सर्वासमक्ष त्याला थोबाडीत मारल्याचं सांगितलं जाते. या घटनेनंतर चंद्रहार शिंदे मानसिक तणाव आणि नैराश्यात गेल्याचं कुटुंबीयांनी सांगितलं.

१४ मे रोजी सायंकाळी चंद्रहार याने आपल्या वडिलांना फोन करून, ''हा माझा शेवटचा फोन आहे, यापुढे माझा फोन येणार नाही,'' असं सांगितलं. त्यानंतर त्याने फोन बंद केला. या वाक्यामुळे कुटुंबीयांमध्ये चिंतेचे वातावरण निम ाण झालं.

वडिलांना फोन केल्यानंतर चंद्रहार शिंदे मौजे करेवाडी शिवारातील मुंगळ्याचा माळ येथे गेला. तेथे त्याने लिंबाच्या झाडाला सुती पांढऱ्या दोरीने गळफास घेऊन जीवन संपवलं. मुलाचा शोध घेत असताना वडिलांना तो गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. या प्रकरणी संबंधित तरुणीविरुद्ध सिरसाळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## पीपीपी धोरणांतर्गत वाटप केलेल्या ५ शाळांच्या भूखंडांचे वाटप तात्काळ रद्द करा

**मुंबई/प्रतिनिधी :** शाळांसाठी राखीव असलेले भूखंड खाजगी संस्थांना वाटप करण्याच्या मुंबई म हानगरपालिकेच्या सार्वजनिक-खाजगी भागीदारी (पीपीपी) धोरणावर तीव्र आक्षेप भाजपचे मुंबई अध्यक्ष आणि आमदार अमीत साटम यांनी घेत या पाचही भूखंडांचे वाटप तात्काळ रद्द करण्याची मागणी केली आहे. महापौर रितू तावडे आणि मुंबई महापालिका आयुक्त आश्विनी भिडे यांना निवेदन देत त्यांनी ही मागणी केली आहे.महापौर आणि आयुक्तांना लिहिलेल्या या पत्रात साटम यांनी म्हटले आहे की, महापालिकेने मुंबई महापालिका शाळांसाठी राखीव असलेले पाच भूखंड खाजगी संस्थांना पीपीपी मॉडेल अंतर्गत वाटप करण्याची प्रक्रिया आधीच पूर्ण केली आहे.

हे धोरण अशा काळात तयार करण्यात आले, जेव्हा मुंबई महापालिका अस्तित्वात नव्हती. धोरणातील अटी व शर्ती, महापालिकेची भूमिका किंवा पालिकेला मिळणारे लाभ यावर कोणतीही चर्चा झाली नाही. लोकप्रतिनिधींशी पुरेशी चर्चा न करता आणि पारदर्शकतेचा अभाव ठेवून हे धोरण घाईघाईने लागू करण्यात आले आहे. या धोरणामुळे मुंबई महापालिकेच्या हिताला बाधा पोहोचल्याचे प्रथमदर्शनी दिसते,'' असा आरोपही आमदार साटम यांनी केला आहे.मुंबई महापालिका आणि शहराचे व्यापक हित लक्षात घेता, सर्व लोकप्रतिनिधी आणि शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांची मते जाणून घेतल्यानंतर या विषयावर सखोल चर्चा करण्याची गरज आहे, अशी सूचना आमदार साटम यांनी केली.मुंबई महापालिकेने पाच भूखंडांचे वाटप तात्काळ रद्द करावे. धोरणाचा सर्वसमावेशक आढावा घेण्यासाठी एक समिती नेम ावी. पालिका सभागृहात सविस्तर चर्चा करावी आणि त्यानंतर संतुलित व सर्वसमावेशक धोरण तयार करून त्याची अंमलबजावणी करावी, अशी मागणी आमदार अमीत साटम पत्रामध्ये केली आहे.

## पोलीस उप महानिरीक्षक यांच्या पथकाकडून कुंटूर येथे गुटखा जप्त

**नांदेड/प्रतिनिधी :** अवैध व्यवसाय विरोधी मोहीमेत आणखी (४४) गुन्हे दाखल, (६१) इसमांविरुद्ध कारवाई नांदेड :- १ ते ३१ मे, २०२६ दरम्यान, नांदेड परिक्षेत्रात अवैध व्यवसाय विरोधी मोहीम राबविण्यात येत आहे.

सदर मोहिमेच्या १५ व्या दिवशी, पोलीस उप महानिरीक्षक यांच्या अधिपत्याखालील पथकाने, नांदेड जिल्ह्यातील कुंटूर पोलीस ठाणे हद्दीत साठवणूक केलेला २,४७,००९/- रुपये किंमतीचा गुटखा जप्त केला आहे. यातील आरोपींविरुद्ध कलम १२३ भारतीय न्याय संहिता अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्यास दहा वर्षाच्या कारावासासह द्रव्य दंडाची देखील शिक्षा आहे.

त्याचबरोबर, मटका-जुगार खेळणाऱ्या व खेळविणाऱ्या एकूण (१०) इसमांविरुद्ध महाराष्ट्र जुगार कायद्याअंतर्गत (६) गुन्हे दाखल



करण्यात आले असून, त्यांच्याकडून ४५,२७०/-/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यासोबतच, अवैध दारू विक्री करणाऱ्या (२७) इसमांविरुद्ध (२४) गुन्हे दाखल करून, त्यांच्याकडून ९०,०५०/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अवैध वाळू उपसा करणाऱ्यांविरुद्धही (२) गुन्हे दाखल करून त्यांच्याकडून ४६,११,८०२/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. उपरोक्त कारवाई सोबतच, शस्त्र अधिनियमान्वये (३), कोटपा अन्वये (२), तर इतर अधिनियमाखाली मिळून, एकूण (४४) कारवाया करण्यात आल्या असून, यात निष्पन्न झालेल्या आरोपीतांकडून एकूण ६५,७१,४२६/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

खबर हेल्पलाइनला नागरिकांचा प्रतिसाद : अवैध व्यवसायांची माहिती थेट पोलिसांना देता यावी, या दृष्टिकोनातून, पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयाने ९१ ५० १०० १०० हा मोबाईल क्रमांक असलेली खबर नावाची हेल्पलाइन सुरू केली असून, सदर हेल्पलाइनला नागरिकांचा वाढता पाठिंबा मिळत आहे. नागरिकांनी आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती, सदर क्रमांकावर फोन करून अथवा व्हाट्सअप मेसेज द्वारे पाठवावी, असे आवाहन पोलीस उप महानिरीक्षक श्री. शहाजी उमाप यांनी केले आहे.

## आयपीएल क्रिकेट सट्टा चालविणाऱ्या आरोपीस ७ लाखांहून अधिक मुद्देमालासह अटक,स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्ह्यात अवैध धंदे, जुगार, सट्टा व गुन्हेगारी प्रवृत्तीवर प्रभावी आळा घालण्यासाठी पोलीस अधीक्षक यांनी दिलेल्या निर्दे शानुसार स्थानिक गुन्हे शाखेकडून सातत्याने विशेष मोहिम राबविण्यात येत आहे. त्याच अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने येरोळ मोड येथे कारवाई करत आयपीएल क्रिकेट सामन्यावर मारुती स्वीफ्ट कारमध्ये बसून ऑनलाईन सट्टा चालविणाऱ्या एका आरोपीस ताब्यात घेत तब्बल ७ लाख ०६ हजार ७१० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

दिनांक १५ मे २०२६ रोजी रात्री पो-लीस अधीक्षक श्री अमोल तांबे यांच्या निर्देशांवर, अपर पोलीस अधीक्षक श्री मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे सहायक पो-लीस निरीक्षक श्री. सदानंद भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने शिरूर अनंतपाळ




तालुक्यातील येरोळ मोड येथील एका हॉटेलजवळ एक इसम मारुती स्वीफ्ट कारमध्ये बसून आयपीएल क्रिकेट स्पर्धेतील लखनऊ सुपर जायंट्स विरुद्ध चेन्नई सुपर किंग्ज या सामन्यावर पैसे लावून क्रिकेट सट्टा चालवत आहे. मिळालेल्या खात्रीशीर माहितीच्या आधारे पोलिसांनी तात्काळ सापळा रचला. रात्री सुमारे १०.५० वाजण्याच्या सुमारास संशयित मारुती सुझुकी स्वीफ्ट कार क्रमांक -५५--०५३४ मध्ये आढळून आला. त्यास ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने आपले नाव १) तातेराव शिवाजी दंडीमे, वय ३४ वर्षे, रा. स्वामी विवेकानंद नगर, निडेवन रोड, उदगीर असे सांगितले. पोलिसांनी त्याची व वाहनाची झडती घेतली असता क्रिकेट सट्टा चालविण्यासाठी वापरण्यात येणारे साहित्य मोबाईल, लॅपटॉप, रोख रक्कम व वाहन असा मुद्देमाल आढळून आला. या कारवाईत आरोपीकडून दोन कंपनीचे मोबाईल फोन, एक कंपनीचा लॅपटॉप, मारुती सुझुकी स्वीफ्ट कार, रोख रक्कम, सट्ट्याच्या हिशोबासाठी वापरण्यात येणाऱ्या डायऱ्या व कॅल्क्युलेटर असा एकूण ७,०६,७१० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपी मोबाईल व लॅपटॉपच्या माध्यमातून आयपीएल क्रिकेट सामन्यांवर ऑनलाईन बेटिंग स्वीकारत असल्याचे प्राथमिक चौकशीत निष्पन्न झाले आहे.

सदर प्रकरणी आरोपी तातेराव शिव-ाजी दंडीमे याच्याविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस स्टेशन शिरूर अनंतपाळ यांच्या मार्फत करण्यात येत आहे.

ही उल्लेखनीय कामगिरी पोलीस अधीक्षक श्री अमोल तांबे, अप्पर पोलीस अधीक्षक श्री मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक श्री. सदानंद भुजबळ यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक श्री.प्रमोद देशमुख, पोलीस अंमलदार तुळशीराम बरुरे, सूर्यकांत कलमे, पाराजी पुठ्ठेवाड, राजेश कंचे, प्रदीप स्वामी, अंजली गायकवाड, पो-लीस ठाणे शिरूर अनंतपाळचे पोलीस अमलदार घाडगे, साठे यांनी केली आहे.


लातूर जिल्हा पोलीसांकडून नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की, क्रिकेट सट्टा, ऑनलाईन जुगार व अवैध धंद्यांबाबत माहिती पोलिसांना तात्काळ द्यावी. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी अशा कारवाया पुढेही अधिक तीव्रतेने सुरू राहणार असल्याचे पोलिस प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

संपादकीय...

## मान्सूनच्या आगमनाची सुवार्ता

तापमानाचा पारा अर्धशतक झळकावण्याच्या दिशेने चाललेला असताना, उष्णतेच्या लाटांनी सर्वदूर होरपळ होत असताना भारतीय हवामान खात्याने दिलेली मान्सूनच्या आगमनाची सुवार्ता दिलासादायक आहे. यंदा मान्सूनचे आगमन वेळेपूर्वी होण्याची दाट शक्यता आहे. मान्सूनच्या प्रवासासाठी सध्या अत्यंत पोषक स्थिती तयार झाली असून, १६ मे च्या सुमारास बंगालचा उपसागर, अंदमान समुद्र आणि अंदमान-निकोबार बेटांवर मान्सूनचे आगमन होऊ शकते, असे हवामान खात्याचे म्हणणे आहे. मान्सूनच्या प्रगतीसाठी आवश्यक असलेले समुद्रावरील वार्यांची दिशा, आर्द्रता आणि वातावरणीय दाबाचे घटक सध्या अनुकूल आहेत. बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र अधिक सक्रिय झाल्यामुळे मान्सूनची पावले वेगाने भारताच्या दिशेने पडू लागली आहेत. मान्सूनचा हा प्रवास असाच अखंड सुरू राहिल्यास केरळ आणि महाराष्ट्रातही पाऊस वेळेपूर्वी धडकू शकतो. मान्सूनचे आगमन नेमके झाले आहे का, मान्सूनपूर्व पाऊस आहे की अवकाळी ही चर्चा दरवर्षी रंगते. हवामान खात्याच्या संकेतांनुसार मान्सूनच्या अधिकृत आगमनासाठी केवळ पाऊस पुरेसा नसून तीन अटी पूर्ण होणे आवश्यक असते. एक म्हणजे केरळमधील १४ ठरावीक हवामान केंद्रांपैकी किमान ६० टक्के केंद्रांवर सलग दोन दिवस २.५ मिलिमीटर किंवा त्यापेक्षा जास्त पावसाची नोंद होणे. दुसरी म्हणजे वातावरणातील वार्याचा वेग ठरावीक उंचीवर ठरावीक मर्यादेपेक्षा जास्त असणे आणि तिसरी म्हणजे उपग्रहाद्वारे मोजल्या जाणार्या उष्णतेच्या लहरींचे प्रमाण विशिष्ट मर्यादेच्या खाली असणे. या तिन्ही गोष्टींची पूर्तता झाल्यावरच मान्सून केरळमध्ये दाखल झाल्याचे जाहीर केले जाते. मान्सूनच्या आगमनाच्या तारखेत दरवर्षी तफावत आढळते. तरीही साधारणपणे एक जूनला मान्सून केरळमध्ये दाखल होतो. गतवर्षी मात्र तो २४ मे रोजी तर २०२४ मध्ये ३० मे रोजी पोहोचला होता. गेल्या पाच वर्षांत मे महिन्याच्या मध्यानंतर दक्षिण भारतात आणि बंगालच्या उपसागरात मान्सूनपूर्व हालचालींना वेग आल्याचे संशोधनातून स्पष्ट झाले आहे. भारतातील एकूण पावसाच्या ७० टक्क्यांहून अधिक पाऊस जून ते सप्टेंबर या चार महिन्यांत पडतो. मान्सूनचे लवकर किंवा उशिरा येणे याचा परिणाम विविध क्षेत्रांवर होतो. खरीप हंगामातील पेरण्यांचे संपूर्ण नियोजन मान्सूनच्या आगमनावर अवलंबून असते. मान्सून वेळेवर आला, तर जमिनीतील ओलावा पेरणीसाठी अनुकूल बनतो. यामुळे उत्पादनात वाढ होते. याउलट मान्सून लांबणीवर पडल्यास पिकांचे चक्र विस्कळीत होते आणि त्याचा फटका अन्नधान्य उत्पादनाला बसतो. प्रमुख धरणे आणि नद्यांमधील पाणीसाठा मान्सूनवरच अवलंबून असतो. मान्सूनचे आगमन वेळेवर झाल्यास जलविद्युत प्रकल्पांची कार्यक्षमता टिकून राहते आणि उन्हाळ्यातील पाणीटंचाईचा ताण कमी होण्यास मदत होते. मान्सूनच्या अनिश्चिततेमुळे शेती उत्पादनात घट झाल्यास अन्नधान्याचे भाव वाढूत त्याचा फटका सर्वसामान्यांना आणि विकास दराला बसतो. अरबी समुद्र, बंगालच्या उपसागरातील पृष्ठभागाचे वाढते तापमान मान्सूनच्या आगमनावर परिणाम करत आहे. हवामान बदलामुळे मान्सून आगमनाची तारीख आणि पावसाचे वितरण यात मोठी अनिश्चितता निर्माण झालीय. आगमनाइतकेच मान्सूनचे वितरणही महत्त्वाचे आहे. वेळेवर दाखल होऊन नंतर खंड पडल्यास शेतकर्यांवर दुबार पेरणीचे संकट येते. गेल्या काही वर्षांत कमी कालावधीत जास्त पाऊस पडण्याचे प्रमाण वाढत चालले आहे. पूर्वी पावसाळ्यात १०० दिवस पाऊस पडायचा. आता एखाद्या वर्षी तो ८० तास पडतो, तर एखाद्या वर्षी अतिवृष्टी होऊन ओल्या दुष्काळाचे संकट निर्माण होते. यंदा अल निनो सक्रिय झाल्यामुळे मान्सून सरासरीपेक्षा कमी बरसण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. शेतकरी, सामान्य जनता आणि शासन-प्रशासन सारेजण त्यामुळे काहीसे चिंतेत आहेत. मे महिन्याच्या उत्तरार्धातील स्थिती महत्त्वाची आहे. अरबी समुद्र किंवा बंगालच्या उपसागरात या काळात निर्माण होणारी चक्रीवादळे मान्सूनच्या वाटचालीवर परिणाम करतात. हे चक्रीवादळ ओमान किंवा पाकिस्तानच्या दिशेने सरकले, तर ते मान्सूनसाठी आवश्यक असलेली आर्द्रता सोबत घेऊन जाते. यामुळे मान्सूनचे वारे कमकुवत होतात आणि केरळमध्ये पावसाचे आगमन लांबणीवर पडते. यंदा अशी शक्यता दिसत नाही, हीदेखील आनंदाची बाब आहे. अल निनो सक्रिय असतानाच्या काही वर्षांमध्ये भारतीय उपखंडात पर्जन्यमान चांगले राहिल्याची उदाहरणे इतिहासात आढळतात. १९५१ ते २०२३ या कालावधीतील सुमारे १५ अल निनो वर्षांपैकी साधारण ६ वर्षांमध्ये भारतात सामान्य किंवा सामान्यपेक्षा जास्त पावसाची नोंद झाली. यामागे 'इंडियन ओशन डायपोल' हा घटक अत्यंत प्रभावी ठरतो. हिंदी महासागराचा पश्चिम भाग पूर्वेकडील भागापेक्षा जास्त उबदार असतो, तेव्हा त्याला 'पॉझिटिव्ह आयओडी' म्हटले जाते. हा घटक प्रशांत महासागरातील अल निनोच्या नकारात्मक प्रभावाला निष्प्रभ करतो. १९९७ मध्ये शतकातील सर्वात शक्तिशाली अल निनो सक्रिय असूनही भारताने सामान्यपेक्षा जास्त म्हणजे १०२ टक्के पाऊस अनुभवला होता. त्यामुळे अल निनो, भीषण दुष्काळ असे म्हणत भुई थोपटण्यापूर्वी मान्सूनला अनुकूल अन्य घटकांमधील बदलांकडे लक्ष ठेवणे आवश्यक ठरते. पाऊस किती पडतो यापेक्षाही आपण तो साठवतो किती, जमिनीमध्ये किती जिरवतो हे अधिक महत्त्वाचे आहे. आजवर आलेल्या दुष्काळांनी प्रचंड मोठे नुकसान सोसावे लागले. तरीही  जल संवर्धन, पाणीवापर याबाबत समाजात पुरेशी जागरुकता नाही. जलयुक्त शिवार योजनेतून राज्यातील किती तरी गावांची पाणीटंचाई दूर होऊन तेथील भूजलपातळी उंचावली. नाला खोलीकरण, रुंदीकरण, सिमेंट साखळी बंधारे यांचा समावेश असणारा हा उपक्रम महाराष्ट्राला पाणीदार करणारा आहे. या मोहिमेमुळे राज्यात सुमारे २५ लाख टीसीएमहून अधिक  पाणी साठवण क्षमता निर्माण झाली. यंदा मान्सून काळात जास्तीत जास्त जलसंवर्धन झाल्यास पावसात पडणार्या खंडामुळे निर्माण होणारा ताण जाणवणार नाही. जागतिक संकटामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा सामना करताना इंधनाचा काटकसरीने वापर करण्याबाबत समाज जागृत होत आहे. तीच जागरुकता पाणीवापराबाबतही दिसायला हवी.

# 'अंधारावर सुर्य गोंदला' ; सामाजिक जाणीवांचा काव्यात्मक आविष्कार




कविता ही केवळ शब्दांची जुळवाजुळव नसते; तर ती काळजाच्या गाभाऱ्यातून उमटलेली जीवंत भावना,प्रतिभा,समाजाच्या वास्तवाचे प्रतिबिंब असते.प्रतिभावंत कवी संजय एकनाथ गायकवाड यांचा अंधारावर सुर्य गोंदला हा काव्यसंग्रह अशाच संवेदनशील,सामाजिक आणि वैचारिक जाणीवांनी समृद्ध झालेला प्रभावी दस्तऐवज आहे.त्यांच्या पहिल्या सुर्यांधकारात माणूस या काव्यसंग्रहानंतर आलेला हा संग्रह अधिक परिपक्व,अधिक व्यापक आणि अधिक अंतर्मुख करणारा वाटतो.मानवी साद प्रतिसादाचे अनंत पैलू जिथे सतत दिसून येतात,त्या बृहन्मुंबई महानगरपालिकेसारख्या ठिकाणी कार्यकारी अभियंता पदावर सेवेत नित्यनेमाने व्यस्त असतांनाही काव्य लेखनाची आवड असणे व प्राप्त परिस्थितीत ती जोपासणे हे निश्चितच कौतुकास्पद आणि अभिमानास्पद आहे.त्यांनी अनेक कवितेतून वेगळेपणा,आत्मियता,बांधिलकी, प्रेम, दुःख,त्याग असे विविध पैलू उलगडण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. सुर्यांधकारात माणूस काव्यसंग्रहाची २६ ऑगस्ट २००९ रोजी दैनिक विश्व सम्राट मध्ये समीक्षा लिहिली त्यावेळी जसं दडपण होतं,तसंच यावेळी जाणवलं.सामाजिक भान, संवेदनशीलता आणि काव्यात्मकता जपत ही समीक्षा लिहिण्याचा प्रयत्न केला आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे सारे जीवन हे केवळ वैयक्तिक संघर्षाचे नव्हे,तर सामाजिक परिवर्तनाच्या अखंड लढ्याचे प्रतीक आहे. त्यांच्या दृष्टीने शिक्षण हे नोकरीचे साधन नसून,ते मुक्तीचे प्रभावी साधन होते.म्हणूनच त्यांनी 'पेन आणि ब्रेन' या शस्त्राच्या आधारे अज्ञान,अंधश्रद्धा आणि अन्यायाविरुद्ध यशस्वी लढा उभारला. हीच वैचारिक पार्श्वभूमी लक्षात घेऊन प्रतिभावंत कवी संजय एकनाथ गायकवाड यांच्या 'अंधारावर सुर्य गोंदला' या काव्यसंग्रहाचे आशयसूत्र शीर्षकातून अधिक स्पष्ट होते. 'अंधार' म्हणजे अज्ञान,अन्याय,दडपशाही आणि ऐतिहासिक शोषणाचे प्रतिक म्हणून उभा राहतो. तर 'सूर्य' म्हणजे ज्ञान,जागृती, स्वातंत्र्य आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रबोधनकारी, परिवर्तनवादी अनमोल विचार.मात्र सुर्य ही केवळ प्रकाशाची प्रतिमा नसून ती ऊर्जा,सातत्य आणि बंडखोरीचेही प्रतिक आहे.अंधार आणि सुर्य या प्रतिमा केवळ नैसर्गिक नसून त्या सामाजिक वास्तवाचे प्रतिक आहे. कवी अंधार नाकारत नाही; तर उलट त्यावर 'सुर्य गोंदण्याचा' म्हणजे परिवर्तन घडवण्याचा, अंधारावर प्रकाश टाकणारा,संघर्षातून उभा राहणारा आशावाद दाखवतो.अज्ञान दूर करणारी ज्ञानशक्ती हीच खरी क्रांती आहे.हीच या संग्रहाची केंद्रस्थानी असलेली भूमिका आहे. या शिर्षकातूनच काव्यसंग्रहाचा आशयगर्भ केंद्रबिंदू स्पष्ट होतो.तर मुखपृष्ठावर दिसणारी अंधारातून प्रकाशाकडे झेप घेणारी मानवी आकृती ही केवळ एका व्यक्तीची प्रतिमा नसून,शतकानुशतकांच्या अन्याय,दडपशाही आणि गुलामीच्या साखळदंडातून मुक्त होण्यासाठी झगडणाऱ्या समस्त वंचित समाजाचे प्रतिक वाटते. शरीराभोवती असलेला ज्वालामय प्रकाश संघर्ष,वेदना,विद्रोह आणि नवचैतन्य यांचे प्रभावी दर्शन घडवतो.नव्या उष:कालाची चाहूल देतो. तेजस्वी प्रकाशासह दर्शविलेला पेन हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पेन आणि ब्रेन या विचारांची आठवण करुन देतात.

अंधारावर सुर्य गोंदला हा काव्यसंग्रह समकालीन सामाजिक वास्तवाशी निगडित आहे.विषमता,दुःख,संघर्ष,मातृत्व,मानवी मूल्ये आणि परिवर्तनाची आशा यांचे प्रभावी चित्रण यात आढळते. विशेषतः दलित, वंचित आणि कष्टकरी समाजाच्या अनुभव विश्वाला गायकवाड यांनी प्रामाणिकपणे अभिव्यक्त केले आहे.विषमता,अन्याय, दुःख, संघर्ष, संताप आणि स्वाभिमान यांचे जिवंत दर्शन या कवितांमधून घडते.कवीची दृष्टी ही वास्तववादी असून,ती कल्पनारंजनापेक्षा अनुभवाधिष्ठित आहे. ते वास्तवाशी थेट भिडतात आणि हीच त्यांची खरी ताकद ठरते.'दीपस्तंभ' आणि 'प्रज्ञासूर्य' या कवितांमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा प्रकाशस्तंभासारखा प्रभाव प्रकर्षाने जाणवतो.लढलास हक्काच्या ओंजळभर पाण्यासाठी,वंचितांचा स्वाभिमान जागविलास माणूस होण्यासाठी या ओळी केवळ स्तुती नाही तर, इतिहासाची जाणीव करुन देतात. 'थँक्यू माझ्या बापा' या कवितेत आदर, वैचारिक निष्ठा, कृतज्ञतेचा संगम दिसून येतो. या कवितांमधून आंबेडकरी विचारांचे प्रेरणादायी रुप प्रभावीपणे उलगडते.

मातृत्वाचे चित्रण हा या काव्य संग्रहाचा आणखी एक हृदयस्पर्शी पैलू आहे. 'आई', 'माझी माय', 'आई-बाप' या कवितांमधून आईचे त्यागमय, कष्टमय आणि करुण रुप प्रभावीपणे, अत्यंत संवेदनशीलपणे वास्तवदर्शी चित्रण केले आहे. येथे आईचं देवत्वीकरण न करता तिच्या मानवी संवेदना आणि संघर्ष अधोरेखित केले आहेत ही बाब विशेष लक्षणीय ठरते. 'करार' ही कविता मानवी मूल्यांचा जाहीरनामा वाटते. जात,धर्म,भेदभाव नाकारुन 'माणूस' म्हणून जगण्याचा ती आग्रह धरतात. सुगंध ही कविता राष्ट्राची एकता दाखवते. विविध जाती,धर्म, संस्कृती असूनही भारत एकच आहे हा संदेश प्रतिकात्मक पध्दतीने दिला आहे. आईच्या त्यागाचे अत्यंत हृदयद्रावक, प्रभावी चित्रण क्षण या कवितेत केलं आहे. स्त्री जीवनातील वेदना, तिचे मौन, त्याग, समाजातील दुटप्पीपणा आणि दुर्लक्षित भावविश्व कधी पाहतो का तिच्या हृदयावरचे ओरखडे ?, अमरत्व यांसारख्या कवितांतून तिक्ष्ण भाष्य केले आहे. त्याचप्रमाणे 'माझ्या कवितेचं बीज' या कवितेत कवीच्या सर्जनशीलतेचे सामाजिक स्रोत उलगडतात.स्पर्श ही कविता केवळ स्त्रीच्या अनुभवांची नोंद नाही तर, समाजातील विकृत नजरेने आणि असभ्य वर्तनाने जखमी झालेल्या स्त्री मनाचा अंतःस्वर आहे. कवीने स्पर्श या साध्या वाटणाऱ्या शब्दाला अत्यंत व्यापक सामाजिक अर्थ दिला आहे. सामान्यतः स्पर्श म्हणजे माया, आपुलकी,आधार,प्रेम यांचे प्रतिक मानले जाते; परंतु या कवितेत तो भिती, असुरक्षितता,घृणा आणि मानसिक जखमांचे प्रतिक बनतो.तर पहाटेचा आशावादी ही कविता समाजाच्या मुख्य प्रवाहातून फेकल्या गेलेल्या,तिरस्कार सहन करणाऱ्या तृतीयपंथी यांचे वास्तव मांडते.कविता ही केवळ कलात्मक सौंदर्यनिर्मिती नसून वास्तवातून उगवणारी प्रक्रिया आहे,हे यातून अधोरेखित होते.या काव्यसंग्रहाची भाषा साधी,सरळ आणि प्रभावी आहे.प्रतिमा आणि रुपकांचा वापर आशयसुसंगत आहे. कवी अलंकारिकतेपेक्षा आशयप्रधानता जपतो.त्यांच्या कविता सामाजिक विसंवादावर आघात करणाऱ्या असून,मनाला हेलावून,अस्वस्थ करुन सोडतात, काळजाचा ठाव घेतात. तर, पत्नीवर असणारं प्रेम व्यक्त करतांना सुखावून जाणारा प्रियकर त्यांच्या कवितांमध्ये दिसून येतो.

एकूणच अंधारावर सुर्य गोंदला हा काव्यसंग्रह मराठी दलित साहित्य परंपरेत महत्त्वाचे स्थान मिळवू शकतो. कारण, तो केवळ वेदनांचे चित्रण करत नाही, तर प्रबोधन, स्वाभिमान आणि परिवर्तनाची दिशा दाखवतो. एकूणच, 'अंधारावर सुर्य गोंदला' हा काव्यसंग्रह सामाजिक जाणीव, मानवी संवेदना, संघर्ष आणि परिवर्तनवादी विचारांचा प्रभावी संगम आहे. तो वाचकांना केवळ भावनिक पातळीवर स्पर्श करत नाही, तर अंतर्मुख होऊन विचारप्रवृत्त करायला भाग पाडतो, संवेदनशील बनवतो आणि परिवर्तनाच्या दिशेने प्रेरित करतो. हा संग्रह म्हणजे संघर्षातून उगवलेल्या आशेचा किरण आणि परिवर्तनाच्या आकांक्षेचा सशक्त असा दस्तऐवज आहे. त्यांनी आपल्या अनुभवविश्वातून आणि सामाजिक जाणीवेच्या भक्कम पायावर उभ्या असलेल्या विचारांतून या कवितांची निर्मिती केली आहे. अशा या अर्थपूर्ण, जीवंत, सामाजिक भान व मानवी संवेदना असलेल्या काव्यसंग्रहाला आणि कवी संजय एकनाथ गायकवाड यांच्या कवितेची वाटचाल शब्दांच्या समृद्ध प्रदेशांतून होऊन, त्यांच्याकडून सर्वोत्तम, दर्जेदार अशा अनमोल साहित्याची निर्मिती होवो ह्याच त्यांच्या उज्वल भावी वाटचालीस आणि त्यांच्या साहित्य विश्वाला मंगलमय सदिच्छा !

**काव्यसंग्रह : अंधारावर सुर्य गोंदला**
**कवी : संजय एकनाथ गायकवाड**
**रजत प्रकाशन संभाजीनगर**
**किंमत : ₹ १८०/**
**मिलिंद कांबळे चिंचवलकर-**
**९८९२४८५३४९**

# जनगणनेत धर्म,जात प्रवर्ग व जात हा रकानाच वगळण्यात आलेला आहे

भारतीय बौध्द महासभा कार्याध्यक्ष आद.भीमराव यशवंत आंबेडकर यांनी दिनांक २३ सप्टेंबर,२०२० रोजी पत्रकाद्वारे बौध्द समाजाला खालीलप्रमाणे आवाहन केलेले होते पहिल्या धर्माच्या कॉलममध्ये बौध्द लिहावे, दुसर्या कॉलममध्ये अनुसूचित जात आणि तिसर्या कॉलममध्ये अनुसूचित जातीतील जात म्हणजेच पूर्वाश्रमीची- धर्मांतरापूर्वीची जात लिहावी. (उदा.महार, मांग,चांभार, ढोर वगैरे) त्याचबरोबर भारतीय बौध्द महासभेच्या धम्मयान दिनदर्शिका २०२१,२०२२, २०२३, २०२४ ,२०२५ व २०२६ मध्येसुध्दा जनगणनेत बौध्द समाजाने धर्म बौध्द व जात हिंदू महार लिहावे. अशी तळटीप टाकलेली आहे.




MINISTRY OF HOME AFFAIRS (Office of Registrar General India) NOTIFICATION New Delhi, the 22nd January, 2026 रोजी प्रसिध्द केलेल्या गॅझेटनुसार सदरहू आवाहन आणि तळटीप कालबाह्य/गैरलागू झालेली आहे. बौध्दजनांना ह्या गॅझेटनुसार ते फक्त अनुसूचित जातीचे आहेत की, नाहीत एवढीच माहिती द्यायची आहे. (12)Whether the head belongs to Scheduled Caste/Scheduled Tribe/ Other.) The Ministry of Home affairs(MH-) has notified the official 33-questions for the Phase I Houselisting and Housing Census 2027. View the full list including questions on internet access, cereal consumption and more.(News dated 23/01/2026) Census 2027 Phase I: Full List of The 33-Question The Ministry of Home -ffairs (MH-) has officially released the questionnaire for the first phase of the Census of India 2027, which allows census officers to collect data according to a scheduled digital timetable. The Questionnaire highlights India's new digital world, changing food trends, and rising standard of living. -ccording to a gazette notification issued by the Registrar General and Census Commissioner of India (RGCCI), the first phase will comprise houselisting and a housing census. It would include a comprehensive 33-question survey aiming at mapping the living conditions, amenities, and assets of Indian families. What -re the 33 Questions for First Phase of Census 2027? The questionnaire comprises housing infrastructure, domestic amenities, and assets. Notably, the government has included questions on internet access and cereal consumption while deleting the previous question on financial services. Here is the full list of 33-Questions

घरांच्या यादीत ३३ प्रश्न विचारले जातील. जनगणना ३३ प्रश्न: पहिल्या टप्प्यात,घरे आणि घरगुती सुविधांशी संबंधित एकूण ३३ प्रश्न विचारले जातील.यामध्ये घराची मालकी,वापर,भिंत,छप्पर आणि फरशीचे साहित्य आणि खोल्यांची संख्या यांसारखे प्रश्न असतील.तुम्हाला याची यादी येथे मिळेल: जनगणनेत विचारले जाणारे ३३ प्रश्न

1) Building number (Municipal or local authority or census number). १) इमारत क्रमांक (नगरपालिका/ स्थानिक संस्था/जनगणना क्रमांक)
2) Census house number. २) जनगणना घर क्रमांक
३) Predominant material of floor of the census house. ३) घराच्या मजल्याचे मुख्य बांधकाम साहित्य
४) Predominant material on the wall of the census house. ४) घराच्या भिंतीचे मुख्य बांधकाम साहित्य
५) Predominant material of roof of the census house. ५) घराच्या छताचे मुख्य बांधकाम साहित्य
६) Ascertain use of census houses. ६) घराचा वापर (निवासी/व्यवसाय इ.)
7) Condition of the census house. ७) घराची स्थिती
8) Household number. ८) घराची संख्या
9) Total number of persons normally residing in the household.९) घरात सहसा राहणाऱ्या व्यक्तींची एकूण संख्या
10) Name of the head of the household. १०) घराच्या प्रमुखाचे नाव
11) Sex of the head of the household. ११) घराच्या प्रमुखाचे लिंग
12) Whether the head belongs to Scheduled Caste/Scheduled Tribe/ Other. १२) घराचा प्रमुख अनुसूचित जाती/ अनुसूचित जमाती/इतर श्रेणीचा आहे काय ?.
13) Ownership status of the census house. १३) मालकीची स्थिती (मालकीचा/भाड्याने घेतलेला, इ.)



14) Number of dwelling rooms exclusively in possession of the household. १४) घरातील खोल्यांची संख्या संख्या
15) Number of married couple(s) living in the household. १५) घरात राहणाऱ्या विवाहित जोडप्यांची संख्या
16) Main source of drinking water. १६) पिण्याच्या पाण्याचा मुख्य स्रोत
17) Availability of drinking water source. १७) पिण्याच्या पाण्याची उपलब्धता
१८) Main source of lighting. १८) मुख्य स्रोत प्रकाश
19) Access to latrine. १९) शौचालयाची उपलब्धता
20) Type of latrine. २०) शौचालयाचा प्रकार
21) Waste water outlet. २१) सांडपाणी निचरा व्यवस्था
22) Availability of bathing facilities. २२) आंघोळीच्या सुविधांची उपलब्धता
23) Availability of kitchen and LPG/ PNG connection. २३) स्वयंपाकघर आणि एलपीजी/पीएनजी कनेक्शनची उपलब्धता
24) Main fuel used for cooking. २४) स्वयंपाकासाठी वापरले जाणारे मुख्य इंधन
25) Radio/Transistor. २५) रेडिओ/ट्रान्झिस्टरची उपलब्धता
26) Television. २६) टेलिव्हिजनची उपलब्धता
२७) Access to the internet. २७) इंटरनेटची उपलब्धता
28) Laptop/Computer. २८) लॅपटॉप/कॉम्प्युटरची उपलब्धता
29) Telephone/Mobile Phone/ Smartphone. २९) टेलिफोन/मोबाइल/स्मार्टफोनची उपलब्धता
30) Bicycle/Scooter/Motorcycle/ Moped. ३०) सायकल/ स्कूटर/मोटरसायकल/मोपेडची उपलब्धता
31) Car/Jeep/Van. ३१) कार/जीप/व्हॅनची उपलब्धता
32) Main Cereal consumed in the household.३२) घरात वापरल्या जाणाऱ्या मुख्य अन्नधान्याची उपलब्धता
33) Mobile Number (for census related communications only). ३३) मोबाईल नंबर (केवळ जनगणनेशी संबंधित संपर्कासाठी)

जनगणनेच्या पहिल्या टप्प्यात धर्म व अनुसूचित जात हा रकाना नाही. त्यामुळे धर्म व अनुसूचित जात रकान्यात जात लिहिण्याचा मुद्दाच उपस्थित होत नाही. जनगणनेचा दुसरा टप्पा सुरू होण्यापूर्वी धर्म व अनुसूचित जात रकान्यात काहीतरी सुधारणा होईल. उदाहरणार्थ धर्म: बौध्द व अनुसूचित जात: क्र ३७ अशी आशा करू या!

Compiled and Edited by Sharad Adhav, 9833175669,Mumbai

## संक्षिप्त...

### हेमंत दिवेकर 'युथ आयकॉन' गौरव पुरस्काराने सन्मानित



**नवी मुंबई / के. एच. हनवते :** दिनांक १६/५/२०२६ रोजी नवी मुंबई शहर ''युथ आयकॉन'' सन्मान गौरव पुरस्कार सोहळा विष्णुदास भावे नाट्यगृह वाशी नवी मुंबई येथे आनंदात मोठ्या जल्लोषात मान. समिर वानखेडे सर ( ) ऑफिसर यांच्या शुभ हस्ते वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृह वाशी नवी मुंबई येथे शानदार सोहळा पार पडला. या सोहळ्यात १२ युथ आयकॉन ''नवी मुंबई'' यांचा सन्मान करण्यात आले. नवी मुंबई युथ आयकॉन सन्मान - हेमंत मोहन दिवेकर (वंचित बहुजन आघाडी जिल्हा सचिव/ कामगार नेते, समाज समता कामगार संघ उपाध्यक्ष नवी मुंबई ) यांस गौरवण्यात आले.

### भल्या सकाळी उठून कलिंगड खाल्लं अनब थेट मृत्यूने गाठले, कुटुंबासोबत घडले भयंकर, मुंबईनंतर पुन्हा थरकाप उडवणारा प्रकार

**मुंबई :** काही दिवसांपूर्वी मुंबईच्या पायधुनी परिसरात कथितपणे कलिंगड खाल्ल्याने एकाच कुटुंबातील चार जणांचा मृत्यू झाला होता. संबंधित कुटुंबीयांनी रात्री जेवण झाल्यानंतर एकत्रितपणे कलिंगड खाल्लं होतं. यानंतर त्यांची प्रकृती बिघडली. काही वेळाच्या अंतराने या चारही जणांचा मृत्यू झाला. ही घटना ताजी असतानाच, आता अशीच एक धडकी भरवणारी घटना समोर आली आहे.

छातीतील जळजळ आणि पोटातील उष्णता कमी करण्यासाठी कलिंगड खाणं एका व्यक्तीच्या जीवावर बेतलं आहे. कलिंगड खाल्ल्यानंतर तब्येत बिघडून एका व्यक्तीचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. तर त्यांचा तरुण मुलगा सध्या रुग्णालयात मृत्यूशी संघर्ष करत आहे. कलिंगड खाल्ल्यानंतर अशाप्रकारे मृत्यू झाल्याने देशभरात एकच खळबळ उडाली आहे.

**नेमकी घटना काय?**

मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना मध्य प्रदेशातील श्योपूर शहरातील आहे. येथील रिलायन्स पेट्रोल पंपाजवळ इंद्रसिंग परमार (वय ४३) हे आपल्या कुटुंबासह भाड्याच्या घरात राहत होते. ते कार चालवून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करायचे. गुरुवारी रात्री जेवण केल्यानंतर इंद्रसिंग आणि त्यांचा मुलगा विनोद (वय २१) या दोघांनाही छातीत जळजळ होत असल्याचा त्रास सुरू झाला. मात्र, सुरुवातीला सामान्य त्रास समजून दोघांनीही त्याकडे दुर्लक्ष केलं आणि ते झोपी गेले.शुक्रवारी सकाळी पुन्हा एकदा त्यांना तोच त्रास जाणवू लागला. वाढत्या उष्णतेमुळे पोटात जळजळ होत असावी, असा अंदाज बांधून पोट थंड व्हावे म्हणून त्यांनी बाजारातून कलिंगड आणून खाल्लं.

पोट थंड करण्यासाठी खाल्लेले कलिंगड त्यांच्यासाठी काळ ठरेल, अशी कल्पनाही त्यांनी केली नव्हती. कलिंगड खाल्ल्यानंतर काही वेळातच बाप-लेकाची तब्येत सुधारण्याऐवजी अधिकच बिघडली. दोघांनाही तीव्र अस्वस्थ वाटू लागलं आणि मोठ्या प्रमाणात उलट्या सुरू झाल्या.

दोघांचीही प्रकृती खालावत चालल्याचे पाहून घाबरलेल्या कुटुंबीयांनी तातडीने त्यांना जिल्हा रुग्णालयात दाखल केले. तेथे डॉक्टरांनी त्यांच्यावर प्राथमिक उपचार केले, परंतु प्रकृती चिंताजनक असल्याने दोघांनाही पुढील उपचारासाठी राजस्थानमधील कोटा येथे हलवण्याचा सल्ला दिला.कुटुंबीय रुग्णवाहिकेतून दोघांना कोटा येथे घेऊन जात असतानाच, वाटेत इंद्रसिंह यांची प्रकृती अत्यंत खालावली आणि त्यांनी रस्त्यातच अखेरचा श्वास घेतला. तर दुसरीकडे, मुलगा विनोद याला कोटा येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्याच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. त्याची प्रकृती अजूनही अत्यंत गंभीर असल्याचे सांगण्यात येत आहे.

या धक्कादायक घटनेनंतर वैद्यकीय वतुर्ळातही चर्चा सुरू झाली आहे. प्राथमिक तपासणी केल्यानंतर डॉक्टरांनी केवळ कलिंगड खाल्ल्यामुळे तब्येत बिघडल्याची शक्यता फेटाळून लावली आहे. डॉक्टरांच्या मते, हा प्रकार गंभीर 'फूड पॉइजनिंग' (अन्नबाधा) किंवा शरीरात झालेल्या इतर कुठल्यातरी घातक संसर्गामुळे घडला असावा.

### कल्याण रेल्वे स्थानकात जवानावर तिघांचा हल्ला; प्रवाशांमध्ये भीतीचं वातावरण

**कल्याण/प्रतिनिधी :** कल्याण रेल्वे स्थानकात रेल्वे सुरक्षा दलाच्या जवानावर तिघांकडून हल्ला झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकारामुळे स्थानक परिसरात काही काळ तणाव आणि गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. कर्तव्य बजावत असलेल्या जवानावरच हल्ला झाल्याने रेल्वे सुरक्षेचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. या प्रकरणी कल्याण जीआरपी पोलिसांनी तातडीने कारवाई करत तिन्ही आरोपींना ताब्यात घेतले असून पुढील तपास सुरू आहे.मिळालेल्या माहितीनुसार, दादर-गोरखपूर एक्सप्रेसमध्ये एका प्रवाशाला काही जण मारहाण करत असल्याची माहिती आरपीएफचे जवान नरेंद्र यादव यांना मिळाली होती. माहिती मिळताच नरेंद्र यादव यांनी तातडीने संबंधित डब्याकडे धाव घेतली आणि परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला. त्यांनी मारहाण करणाऱ्या तिघांना चौकशीसाठी खाली उतरून प्लॅटफॉर्मवर येण्यास सांगितले.

यानंतर रेल्वे कल्याण स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्रमांक ४ वर उतरल्यावर अचानक या तिघांनी आरपीएफ जवान नरेंद्र यादव यांच्यावरच हल्ला चढवला. आरोपींनी मिळून जवानाला बेदम मारहाण केली. हा प्रकार अचानक घडल्याने प्लॅटफॉर्मवरील प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. काही काळ स्थानकात एकच गोंधळ उडाला होता. घटनेची माहिती मिळताच कल्याण जीआरपी पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. पोलिसांनी हल्ला करणाऱ्या तिघांना ताब्यात घेत त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# वाढत्या कुटुंब कलहामुळे कुटुंब संस्था उध्वस्त होत असल्याने पुढील पिढ्या सामाजिक-शैक्षणिक व कौटुंबिक संस्कारापासून दूर जात आहेत : समाजभूषण उत्तम तरकसे

**नवी मुंबई खारघर:-** नरशी मोजी इन्स्टिटट्यूट ऑफ मॅनेजमेंट महाविद्यालय नवी मुंबईच्या वतीने त्यांच्याच कॉलेजमधील महाविद्यालयातील इमारतीच्या सभागृहात सदर महाविद्यालयाच्या बीए एल एल बी, बी ए एल एल बी असे व्यावसायिक विधी अभ्यासक्रम शिकत असताना पदवी अभ्यासक्रमांतर्गत कायद्याच्या व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमात याचा समावेश असतो याच्या पहिल्या दुसऱ्या वर्षाच्या विद्यार्थ्यांना या व्यावसायिक एलएलबी पदवी अंतर्गत अभ्यासक्रम शिकवण्याकरिता सध्या न्यायालयात डी व्ही व ४९८ अ च्या कायद्याचा होत असलेल्या स्वतःचा फायदा करिता काही महिला सदर कायद्याचा गैरवापर



करून कोर्टात खूप मोठ्या प्रमाणात खोटे खटले दाखल करत असल्याने त्यावर सदर विद्यार्थ्यांना माहिती देण्याकरिता ''समाजभूषण उत्तमराव दासू तरकसे आसरडोहकर (महाराष्ट्र शासनाच्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्काराने सन्मानित ज्येष्ठ साहित्यिक कवी विचारवंत) यांना प्रामुख्याने सदर विषयावर माहिती देण्याकरिता विद्यार्थ्यांना प्रमुख अतिथी म्हणून आमंत्रित केल्याने ते आपल्या मनोगतात म्हणाले की महिलांच्या संरक्षणाकरिता बनवण्यात आलेल्या कायद्याचा काही महिला त्याचा गैरवापर वापर करत पुरुषाचा छळ करत आहेत असेच चालू राहिल्यास पुढील पिढ्या बरबाद होऊन देशाचे नुकसान झाल्याशिवाय राहणार नाही तसेच वाढत्या कुटुंब कलाहामुळे कुटुंब संस्था उध्वस्त होत असल्याने पुढील पिढ्या सामाजिक शैक्षणिक व कौटुंबिक संस्कारापासून दूर जात आहेत अशी खंत व्यक्त करत हे शासनाने पुढाकार घेऊन या सदरच्या कायद्यात सुधारणा करत स्त्री-पुरुषांमध्ये समानता आणण्याची आवश्यकता आहे

तसेच आपण वकिली व्यवसाय करताना पिढीत जो कोणी असेल त्याला न्याय कसा मिळेल हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून व्यावसाय करावा केवळ स्वतः च्या फायद्यासाठी न करता असे मौलिक मार्गदर्शन एलएलबी च्या विद्यार्थ्यांना केले असल्याने सदरचे संभाषण सर्व विद्यार्थी व त्यांचे प्राध्यापक यांना खूप भावल्याने सर्वांनी समाजभूषण उत्तम तरकसे यांचे त्यांचे प्राध्यापक वनीत पारिख सर यांच्या हस्ते सन्मान करत आभार मानले तेव्हा समाजभूषण उत्तम तरकसे यांनी सुद्धा सदर महाविद्यालयाचे व सर्व विद्यार्थी प्राध्यापक प्राचार्य उपप्रचार्य व शैक्षणिक कर्मचारी यांचे सर्वांचे आभार मानले

## लष्कराच्या दारुगोळा आगारात थरार! मेजरने इन्सास रायफल मधून झाडल्या १५ गोळ्या, सुभेदार मेजरचा जागीच अंत

**नागपूर :** वर्धा जिल्ह्यातील पुलगाव येथील केंद्रीय दारूगोळा आगारात (कॅड) शुक्रवारी सकाळी सरावादरम्यान एका मेजरने केलेल्या गोळीबारात सुभेदार मेजरचा जागीच मृत्यू झाला. या धक्कादायक घटनेमुळे संपूर्ण लष्करी वतुर्ळात प्रचंड खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पुलगाव येथील लष्करी तळावर शुक्रवारी सकाळी नियमित सराव सुरू होता. पुलगाव पोलीस ठाण्यात नोंदवलेल्या प्रथम माहिती अहवालानुसार (एफआयआर), लष्करातील मेजर मनन तिवारी यांनी स्वत:चा सराव संपल्यानंतर अचानक ५.५६ एमएम इन्सास रायफलमधून आपल्याच कनिष्ठ सहकाऱ्यावर अगदी जवळून गोळ्या झाडल्या. या प्राणघातक हल्ल्यात सुभेदार मेजर ओम बहादूर खांद यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. त्यांच्यावर एकापाठोपाठ एक तब्बल १५ हून अधिक गोळ्या झाडल्या गेल्याचे वरिष्ठ पोलीस सूत्रांनी सांगितले.

गोळीबाराचा प्रचंड आवाज ऐकून घटनास्थळी उपस्थित असलेल्या इतर लष्करी जवानांनी आणि प्रत्यक्षदर्शींनी तत्काळ धाव घेतली. त्यांनी मेजर मनन तिवारी यांना पुढील अनर्थ घडवण्यापूर्वीच जागीच रोखले आणि त्यांच्याकडून शस्त्र काढून घेत त्यांना ताब्यात घेतले. या घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलिसांनी घटनास्थळाकडे धाव घेतली. सध्या आरोपी मेजर तिवारी लष्कराच्या ताब्यात असून, पुढील तपासासाठी त्यांना वर्धा पोलिसांच्या स्वाधीन केले जाणार आहे.

## दिलीप आमले यांना यंदाचा आदर्श व्यसनमुक्ती देव माणूस पुरस्काराने सन्मानित



**नवी मुंबई / के. एच. हनवते :** ।। संत गजानन महाराज ।। व्यसनमुक्ती देवमाणूस आपला माणूस श्री दिलीप किसनराव आमले यांना ''आदर्श व्यसनमुक्ती देव माणूस पुरस्कार २०२६ मिळाल्याने नवी मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रातील सामाजिक, युवा, सेवाभावी आणि जनहित कार्य करणाऱ्या अनेक सहकाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. कारण समाज प्रबोधनकार, व्यसनमुक्ती जनजागृती अभियानाचे प्रेरणास्थान श्री दिलीप किसनराव आमले यांना ''आदर्श व्यसनमुक्ती देवमाणूस पुरस्कार २०२६'' प्रदान करण्यात आला आहे. हा सन्मान मा. श्री समिर वानखेडे साहेब (कमिशनर आय आर एस, चेन्नई, भारत सरकार) यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला. गेल्या दोन दशकांपासून श्री दिलीप किसनराव आमले यांनी संपूर्ण समाजामध्ये मोफत व्यसनमुक्ती जनजागृती अभियान अत्यंत प्रभावीपणे राबविले आहे. शाळा, कॉलेज, महाविद्यालये, सामाजिक संस्था, विविध युनियन, आर टी ओ कार्यालय, पोलीस विभाग, वाहतूक पोलीस, महानगरपालिका तसेच अनेक सार्वजनिक ठिकाणी जाऊन त्यांनी युवक, विद्यार्थी, वाहन चालक आणि सर्वसामान्य नागरिकांना व्यसनमुक्त जीवनाचा संदेश दिला आहे. विशेष म्हणजे, प्रत्येक गुरुवारी नवी मुंबई आर टी ओ कार्यालय येथे लर्निंग लायसन्स काढण्यासाठी येणाऱ्या शिकाऊ विद्यार्थ्यांना ते मोफत मार्गदर्शन व संवादाच्या माध्यमातून व्यसनमुक्तीचे महत्व समजावून सांगत आहेत. त्यांच्या या उपक्रमामुळे अनेक युवकांना योग्य दिशा मिळाली असून समाजामध्ये सकारात्मक परिवर्तन घडत आहे. आजपर्यंत त्यांनी १५०० पेक्षा जास्त व्यसनमुक्ती जनजागृती उपक्रम राबविले असून त्यांच्या या निस्वार्थ समाजसेवेबद्दल त्यांना १५१ पेक्षा अधिक पुरस्कार व सन्मान प्राप्त झाले आहेत. व्यसनमुक्त, सुसंस्कृत आणि निरोगी समाज निर्माण करण्यासाठी सतत कार्यरत असलेले श्री दिलीप किसनराव आमले हे अनेकांसाठी प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व बनले आहेत. समाजहितासाठी केलेल्या त्यांच्या कार्याला हा पुरस्कार म्हणजे समाजाने दिलेली सन्मानाची पावती आहे. आदर्श व्यसनमुक्ती देवमाणूस पुरस्कार २०२६ मिळाल्याबद्दल श्री दिलीप किसनराव आमले यांचे मनःपूर्वक अभिनंदन व हार्दिक शुभेच्छा..!

## महा मूम डेव्हलपर्स प्रा. लि. चा प्रथम वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा

**नवी मुंबई / के. एच. हनवते :-** (उलवे) ''महा मुम डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेड'' चा प्रथम वर्धापन दिन १५ मे २०२६ रोजी उलवे सेक्टर १९ येथील (एन एम एस आयकॉन) या आलिशान बिल्डिंग मध्ये ऑफिस नंबर १००३ येथे अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रम सर्वप्रथम आपले आदर्श तथागत भगवान गौतम बुद्ध - बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला आयु. अनिल गोविंद ढाले, आयुनी : दिपाली अनिल ढाले यांनी सुगंधीत पुष्पाने आणि दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात विधिवत बुद्ध वंदना बौद्धाचार्य : कल्याणराव हनवते यांनी घेऊन कार्यक्रमाची सुरुवात केली. त्यावेळी शुभेच्छा पर बोलताना बौद्धाचार्य म्हणाले की '' खातो तो घास बाबासाहेबांचा आणि घेतो तो श्वास बाबासाहेबांचा..! हे सर्व आपल्या सर्वांना त्यागमूर्ती माता रमाई आणि बाबासाहेबांच्या संघर्षामुळे आम्हा सर्वांना ऐश्वर्य सुख वैभव प्राप्त झाले आहे, आज आपल्यातील कार्यकर्ते नेते उच्च शिखरावर पोहोचले आहेत पण बुद्ध - बाबासाहेबांचे त्यांना काहीही घेणे देणे नाही ऑफिसमध्ये फोटो किंवा ऑफिसच्या आजूबाजूला जय भीम बोलायची काही जणांना अजूनही लाज



वाटते, आसे काही आपल्या समाजामध्ये लखपती बांधव आहेत काही लोकांना बुद्ध - बाबासाहेब हे केवळ मंगल परिणय आणि मयताच्या वेळीच आठवते, बाकी छोटे मोठे कार्यक्रम घेण्यास त्यांच्याकडे वेळ नाही अंधश्रद्धा क्रमकांडात भरकटलेले आहेत अशा लोकांसाठी आम्ही काय म्हणावे, आयु. अनिल ढाले यांच्यासारखे क्वचित दानशूर कार्यकर्ते समाजामध्ये आहेत अनिल ढाले यांनी आपल्या ऑफिसमध्ये बुद्ध बाबासाहेबांची प्रतिमा लावून नमो बुद्धाय जय भीम चा गजर करून कार्यक्रमाची आखणी केली आणि आमच्यासारख्या बौद्धाचार्यांना पाचारण करून धम्म सेवा करण्याची सेवा उपलब्ध करून दिली त्याबद्दल बौद्धाचार्य : कल्याणराव हनवते यांनी त्यांच्याप्रती मंगल मैत्री आणि मंगलकामना करून त्यांच्या पुढील कार्यास मंगलमय हार्दिक शुभेच्छा दिल्या व उत्तरोत्तर भविष्यात यांच्या शाखा अनेक ठिकाणी ओपन होतील असी सदिच्छा व्यक्त केली,

# महाराष्ट्र राज्य राष्ट्रीय साखर कामगार फेडरेशन अध्यक्षपदी श्रीनिवास देशमुख यांची निवड

### लातूरच्या मांजरा साखर परिवारातील अधिकाऱ्यांना राज्यपातळीवर संघटनेत मिळाली संधी

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य राष्ट्रीय साखर कामगार फेडरेशनच्या अध्यक्षपदी राज्यातील साखर कारखानदारी नावलौकिक असलेल्या लातूरच्या विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा सहकारी साखर कारखान्याचे हेड टाईम कीपर असलेले श्रीनिवास देशमुख यांची निवड जाहीर करण्यात आली आहे राज्य पातळीवरील साखर उद्योगात भरारी घेत असलेल्या मांजरा साखर परिवारातील अधिकारी असलेले श्रीनिवास देशमुख यांना महाराष्ट्र राज्य राष्ट्रीय साखर कामगार फेडरेशनच्या अध्यक्ष पदावर संधी मिळाल्याने लातूरच्या मांजरा परिवारातील साखर उद्योगातील कर्मचारी कामगारांत आनंदाचे वातावरण पसरले आहे त्यासंबंधीचे निवडीचे पत्र निवडणूक निर्णय अधिकारी तथा कामगार उपायुक्त माळी,कामगार सहआयुक्त पाटील यांच्या हस्ते अहिल्यानगर येथे देण्यात आले आहे



श्रीनिवास देशमुख हे मांजरा साखर कामगार संघटनेचे अध्यक्ष असून गेली ३९ वर्षापासून मांजरा सहकारी साखर कारखाना येथे कार्य करीत आहेत त्यांच्या या निवडीबद्दल मांजरा साखर कारखान्याचे चेअरमन तथा माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख साहेब साहेब, माजी मंत्री आमदार अमित विलासरावजी देशमुख,लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन धीरज विलासरावजी देशमुख यांच्या सह मांजरा साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक पंडीत देसाई मांजरा साखर कारखान्याचे सर्व संचालक मंडळ,परिवारातील संस्थांचे प्रतिनिधी यांनी निवडीबद्दल अभिनंदन केले आहे.

# जणगणनेत वीरशैव शब्द नको, लिंगायत महासंघाच्या बैठकीत निर्णय

**लातूर/प्रतिनिधी :** लिंगायत महासंघाच्या वतीने २०२६-२७ च्या होत असलेल्या जनगणनेत लिंगायत बांधवांनी काय करावे व काय करू नये यासाठी वीरशैव लिंगायत सांस्कृतिक भवन खंडोबा गल्ली लातूर येथे आज लिंगायत समाजाची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी लिंगायत महासंघाचे प्रांतअध्यक्ष प्रा.सुदर्शनराव बिरादार हे होते. या होत असलेल्या जनगणनेत धर्माची नोंद करत असताना वीरशैव शब्द नको असे ठरवण्यात आले. या बैठकीत राष्ट्रीय जनगणना २०२६ ची सुरुवात झाली असल्याचे सांगण्यात आले.

या जनगणनेचा पहिला टप्पा स्व जनगणनेचा होता व तो पार पडला असून आता घरोघरी प्रगणक जाऊन घरगणना करणार आहेत व पुढच्या टप्प्यात धर्म आणि जात जनगणना होणार असून या जनगणनेच्या वेळी कॉलम नंबर सातमध्ये जे धर्माच्या इतर कॉलम मध्ये काय लिहावे यासाठी समाजात जागृती होण्यासाठी ही बैठक बोलावण्यात आली होती. लिंगायत समाजाने जनगणनेमध्ये धर्म व जातीची कशी नोंद करावी किंवा काय लिहावे याबाबतीत तीन मतप्रवाह पडलेले आहेत. त्यात एक धर्म वीरशैव लिंगायत लिहावे व जात वाणी, जंगम, तेली, माळी, कुंभार इत्यादी लिहावे तसेच दुसरा प्रवाह धर्म हिंदू व जात लिंगायत, वाणी, तेली, माळी, कुंभार इत्यादी प्रत्येकाच्या कागदपत्रावर जसे आहे असेच लिहावे तर तिसरा मतप्रवाह आहे लिंगायत धर्माला मान्यता मिळवायची असून धर्माच्या रकान्यात लिंगायत लिहावे जातीच्या रकान्यात आपापली जात लिहावी अशा या तीनही मतप्रवाहावर साधक-बाधक चर्चा करून सर्वांना मिळून एक प्रवाह सर्व संमतीने निर्माण व्हावा यासाठी लिंगायत महासंघाकडून प्रयत्न करणार असल्याचे बैठकीत सांगण्यात आले. या बैठकीत वरील तीनही विचाराचे फायदे तोटे यावर खूप चर्चा झाली आणि सर्वानुमते धर्माच्या कॉलम मध्ये वीरशैव हा शब्द लिहू नये असे ठरले. या बैठकीत कागदपत्रावर नोंद असलेल्या धर्म हिंदू व जात लिंगायत असेच ठेवावे असेही अनेकांनी मते



मांडली. त्यात त्यांचे म्हणणे असे होते धर्म लिंगायत झाल्यास जातही लिंगायत आहे धर्म आणि जातीचे नाव एकच कसे राहील म्हणून कागदपत्राची भविष्यकाळात अडचण आली तर काय करावे असेही प्रश्न उपस्थित करण्यात आले. जनगणनेमध्ये धर्म हिंदू लिहायचा की धर्माच्या जागी लिंगायत लिहायचे यावर अजून व्यापक चर्चा घडवून आणून एकमत करण्यासाठी जिल्हाभर व्यापक बैठका घेण्याचे ठरले. तसेच काही मान्यवरांनी जगदुरुंचेही मार्गदर्शन घ्यावे असे मत मांडले त्यानुसार जगदुरुनाही भेटण्याचा निर्णय लिंगायत महासंघाने घेतला आहे.

या बैठकीचे प्रास्ताविक लिंगायत महासंघाचे जिल्हा उपाध्यक्ष गणेश पटणे सर यांनी केले तर लिंगायत महासंघाचे चाकूर तालुका अध्यक्ष सुभाष शंकरे, लिंगायत महासंघाचे जिल्हा मार्गदर्शक जी जी ब्रह्मवाले गुरुजी, अखिल भारतीय वीरशैव महासभेचे जिल्हाध्यक्ष शिवराज शेटकार, ॲड.मधुकर राजमाने,डॉ. मन्मथ भातांब्रे यांच्यासह अनेकांनी आपली मते मांडली. अध्यक्षीय समारोप लिंगायत महासंघाचे प्रांतअध्यक्ष प्रा. सुदर्शनराव बिरादार यांनी केला. या बैठकीला माणिकअप्पा मरळे, सिद्रामप्पा पोपडे, नागनाथअप्पा भुरके, विश्वनाथप्पा मिटकरी, शिवाप्पा कोरके, महादेव देवशेट्टे, लिंगायत महासंघाचे अहमदपूर तालुका संपर्कप्रमुख शिवकुमार होळदांडगे, लिंगायत महासंघाचे तालुका निलंगा तालुकाध्यक्ष चंद्रकांत डांगे, अशोक काडादी अजय पाटील, महासंघाचे जिल्हासरचिटणीस चंद्रकांत तोळमारे, लिंगेश्वर बिराजदार, लिंगायत महासंघाचे जिल्हा उपाध्यक्ष तानाजी पाटील भडीकर, सुर्यकांतप्पा हत्ते, शिवकांत गंगापूरे, सविता खिंडे, शिवाप्पा कोरके यांच्यासह अनेक समाज बांधवांची यावेळी उपस्थिती होती. या बैठकीचे सूत्रसंचालन लिंगायत महासंघाचे जिल्हा उपाध्यक्ष शिवाजी भातमोडे सर यांनी केले तर आभार अहमदपुर तालुका संपर्क शिवकुमार होळदांडगे यांनी मानले.

## ज्वेलर्स दुकानावर गोळीबार करत दरोडा, दुकान मालकीणीचा रुद्रावतार पाहून दरोडेखोर पळाले

**नाशिक/प्रतिनिधी :** हिरवाडीतील भरवस्तीत १५ मेच्या रात्री ९.३० वाजता ज्वेलर्स दुकान बंद करण्याच्या वेळी ६ बंदुकधारी दुकानात शिरले. त्यांनी बंदुका रोखत दुकानातील तिघांना मारहाण केली आणि गोळीबार करून दागिने लुटून पसर झाले. यात एक कर्मचारी जखमी झाला असून रात्री उशिरा पंचवटी पोलिसांनी दोन दरोडेखोरांना ताब्यात घेतलं. या घटनेत दुकान मालक नयना पगारिया यांनी जोरदार प्रतिकार केल्याचं सीसीटीव्ही दिसून आलंय. त्यामुळे हाती लागेल तेवढंच घेऊन दरोडेखोर पळून गेले.

हिरावाडी परिसरातील न्यू समृद्धी ज्वेलर्सच्या संचालिका नयना पगारिया यांनी दिलेल्या पोलीस तक्रारीत म्हटलं आहे की, रात्री साडेनऊ वाजेच्या सुमारास दुकान बंद करण्याच्या तयारीत असताना दुकानात एक महिला कर्मचारी आणि श्रीमाळ उपस्थित होते. त्याचवेळी सहा दरोडेखोर दुकानात आले त्यांनी कर्मचाऱ्यांवर बंदूक रोखून जागेवर गोळी घालण्याची धमकी दिली. मात्र मालक नयना यांनी बंदुकीला न घाबरता जोरदार प्रतिकार केला. श्रीमाळ यांनी दरोडेखोरांना पकडण्याचा प्रयत्न केला असता त्यांच्या डोक्यावर बंदुकीने वार करून त्यांना जखमी केलं. नयना यांनी काउंटरवरून उडी मारत दरोडेखोरांना पकडण्याचा प्रयत्न केला, मात्र दरोडेखोर दुचाकीवरून फरार झाले.

..आणि त्यांनी बंदूक काढली - आम्ही दुकान आवरून सर्व दागिने काउंटरवर काढून बॅगेत भरण्याच्या तयारीत होतो. तितक्यात अचानक तीन दुचाकीवरून आलेले सहा जण दुकानात घुसले. त्यांच्या तोंडावर मास्क होते. आम्ही तिघेजण दुकानात होतो. काही कळण्याच्या आत दरोडेखोरांनी आमच्यावर बंदूक रोखली. मी न घाबरतात त्याचा प्रतिकार केला. तरीही एकाने गोळीबार केला. म झा प्रतिकार सुरूच होता. सहकारी श्रीमाळ यांनीही प्रतिकार केला. आम्ही दोघांनी दरोडेखोरांना पकडण्याचा प्रयत्न केला. मात्र एकाने श्रीमाळ यांच्या डोक्यात बंदुकीच्या मागच्या बाजूने मारले. मी काउंटरवरील प्लेट त्यांच्यावर फेकून मारली.काउंटरवर चढून त्यांना पकडण्याचा प्रयत्न केला. ते बिथरले आणि काही दागिन्यांच्या बॅग घेऊन त्यांनी पळ काढला अशी माहिती दुकान मालक नयना पगारिया यांनी दिली.

पोलिसांनी गस्त वाढवावी - हिरावाडी परिसरामध्ये गेल्या काही दिवसापासून अज्ञात व्यक्तींचा वावर वाढला आहे. काही ठिकाणी घरांचे कुलप तोडणे, परिसराची रेकी करणे असे प्रकार वाढले आहेत. त्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण आहे. पोलिसांनी या भागात गस्त वाढवावी अशी मागणी स्थानिक नगरसेवक गौरव गोवर्धने यांनी केली आहे.

## बारव संवर्धनाला प्राधान्य देत अतिक्रमण हटाव मोहीम राबवा – मंत्री आशिष शेलार

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील ऐतिहासिक बारवांचे जतन व संवर्धन करण्यास पुरातत्व विभागाने प्राधान्य द्यावे, यासाठी कृती कार्यक्रम तयार करावा तसेच बारव परिसरातील अतिक्रमणे हटविण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून विशेष मोहीम राबविण्याचे नियोजन करावे, असे निर्देश सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी दिले.

राज्य शासनाने स्थापन केलेल्या बारव संवर्धन समितीची बैठक मंत्री शेलार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. बैठकीस सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ.किरण कुलकर्णी, पुरातत्व विभागाचे संचालक डॉ. तेजस गर्गे यांच्यासह बारव बचाव मोहीमेचे प्रतिनिधी रोहन काळे, अभ्यासक डॉ. पराग सदगीर, डॉ. चंद्रकांत रागिट, सुभाष शिंदे, श्रीनिवास वडगबळाकर, सुभाष शिंदे, श्रीकांत उमरीकर, प्रमोद कुलकर्णी, सौरभ जाम कर, अरविंद कडबे, धायगुडे, भागवत मसणे आदी उपस्थित होते.

बैठकीत बारव संवर्धनाच्या कामात येणाऱ्या अडचणी, आवश्यक उपाययोजना तसेच शासन आणि स्थानिक प्रशासन यांच्यातील समन्वयाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. समिती सदस्यांनी विविध सूचना मांडल्या.

यावेळी मंत्री शेलार यांनी बारव संवर्धनासाठी कार्यपद्धती निश्चित करणारे परिपत्रक जारी करण्याच्या सूचना दिल्या. समिती सदस्यांचा सहभाग, जिल्हाधिकाऱ्यांशी समन्वय, जिल्हा नियोजन निधीतून करण्यात येणाऱ्या कामांमध्ये पुरातत्व संवर्धनाचे निकष पाळणे, समितीच्या नियमित बैठकींचे वेळापत्रक निश्चित करणे आदी बाबींवर भर देण्यात यावा, असे त्यांनी सांगितले. तसेच बारव संवर्धनासाठी कार्यरत संस्था, अभ्यासक, विद्यार्थी आणि स्वयंसेवी घटक यांना प्रशिक्षण देण्यासाठी विशेष कार्यशाळा व शिबिरे आयोजित करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. यासाठी प्रशिक्षण क्षेत्रातील अनुभवी संस्थांचे सहकार्य घेण्याबाबतही त्यांनी सूचना केल्या. राज्य शासनाच्या 'मित्रा' संस्थेमार्फत जागतिक बँकेकडून उपलब्ध होणाऱ्या निधीतून बारव संवर्धनासाठी आर्थिक सहाय्य मिळावे, यासाठी शासन स्तरावर प्रयत्न सुरू असल्याचेही मंत्री आशिष शेलार यांनी यावेळी सांगितले.

## मंत्री संजय राठोड यांच्याकडून वडाळी तलाव परिसराची पाहणी

**अमरावती/प्रतिनिधी :** मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी आज अमरावती येथील वडाळी तलाव परिसराची पाहणी करून परिसरातील विकास कामांचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी प्रस्तावित वंदनीय हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्मारकाच्या नियोजित स्थळालाही भेट देत संबंधित अधिकाऱ्यांसोबत सविस्तर चर्चा केली.

पाहणीदरम्यान मंत्री राठोड यांनी वडाळी उद्यान परिसरात भव्य, आकर्षक व दिमाखदार असे स्मारक उभारण्यात यावे, तसेच शहरातील मुख्य रस्त्यावरूनही सदर स्मारक स्पष्टपणे दिसेल, अशा प्रकारचा आराखडा तयार करण्यात यावा, असे निर्देश दिले. हे स्मारक अमरावती शहराची ओळख ठरणारे व नागरिकांसह पर्यटकांसाठी आकर्षणाचे केंद्र बनले पाहिजे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

तसेच वडाळी तलाव परिसराचे सौंदर्यीकरण, पर्यटन विकास, प्रकाश व्यवस्था, नागरिकांसाठी सुविधा व स्मारक उभारणी संदर्भातील सर्व बाबींवर शासन स्तरावर लवकरच बैठक आयोजित करण्यात येणार असून संपूर्ण प्रस्ताव अंतिम करण्यात येईल, अशी माहिती त्यांनी दिली.

# संत परंपरेने महाराष्ट्राला अध्यात्म, संस्कार आणि मानवतेचा संदेश दिला : माजी मंत्री आ. बनसोडे

**उदगीर/प्रतिनिधी :** संत परंपरेने महाराष्ट्राला अध्यात्म, संस्कार आणि मानवतेचा संदेश दिला आहे. ग्रंथराज ज्ञानेश्वरी हे समाजाला योग्य दिशा देणारे अमूल्य आध्यात्मिक ज्ञान आहे. अखंड हरिनाम सप्ताह आणि पारायण सोहळ्यामुळे समाजात भक्ती, एकोपा आणि सद्भावना वाढीस लागते. तरुण पिढीने संत साहित्याचा अभ्यास करून आपल्या जीवनात चांगले संस्कार रुजवावेत असे मत माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांनी व्यक्त केले.

ते उदगीर तालुक्यातील मौजे रावणगाव येथे हनुमान मंदिर परिसरात आयोजित अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याप्रसंगी उपस्थितांना ते संबोधित करत होते.

यावेळी माजी उपसभापती रामराव बिरादार, लातूर जि.प.चे बांधकाम सभापती ज्ञानेश्वर बिरादार, जि.प. सदस्य दिलीपकुमार मटके, तालुकाध्यक्ष बालाजी भोसले पाटील, उपसभापती बापुसाहेब भोसले, पं.स. सदस्य प्रकाश बिरादार, रावणगावचे सरपंच ज्ञानेश्वर पाटील, आदी उपस्थित होते.

यावेळी गावातील नागरिक, वारकरी संप्रदायाचे भक्त, भजनी मंडळाचे सदस्य तसेच पंचक्रोशीतील




भाविक - भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोहळ्यानिमित्त हरिनामाच्या गजराने व भक्तीमय वातावरणाने परिसर दुमदुमून गेला होता. विविध धार्मिक कार्यक्रम, कीर्तन, भजन व प्रवचनाच्या माध्यमातून भाविकांना अध्यात्मिक संदेश देण्यात आला. यावेळी माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांनी मंदिरात दर्शन घेऊन ग्रामस्थांशी संवाद साधला व आयोजकांचे कौतुक केले. या प्रसंगी ग्रामस्थ, वारकरी संप्रदायाचे मान्यवर, मंदिर समिती सदस्य, कार्यकर्ते आणि महिला भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मुंबई-गोवा अपूर्ण महामार्गावरच सुरु झाली वसुली

नवी मुंबई : गेल्या काळापासून सुरू असणारे मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरण आणि काँक्रीटीकरणाचे काम अजून अपूर्णच आहे. तोपर्यंतच खारपाडा टोलनाक्यावर टोल वसुली सुरू झाली आहे. भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण म्हणजेच एनएचआयने १५ मेपासून टोलनाका सुरू केला. त्यामुळे वाहनचालक, कोकणवासीय आणि स्थानिक नागरिकांतून तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

मुंबई-गोवा महामार्गावरील काही पॅकेजचे काम पूर्ण झाले आहे. मात्र, अनेक ठिकाणी अद्याप रस्ते, सेवामार्ग, उड्डाणपूल, पुलांचे जोडरस्ते आणि सुरक्षा सविधांची कामे सुरूच आहेत. नागोठणेसह कोलाड, इंदापूर आणि इतर ठिकाणी देखील वाहतूक वळवून कामे सुरू आहेत. तर काही ठिकाणी रस्त्यांवर खड्डे, अरुंद मार्ग आणि अपूर्ण असणारे काँक्रीटीकरणाचे काम यामुळे वाहनचालकांना कसरत करावी लागत आहे.

टोलचे दर काय?

कार/जीप/व्हॅनसाठी एकरी प्रवास ९५, दुहेरी प्रवास १४५ आणि मासिक पास ३१५० रुपये असेल. हलकी व्यवसायिक वाहणे आणि मिनी बससाठी एकेरी १५५, दुहेरी २३५ आणि मासिक पास ५१९० रुपये टोल असेल. बस/ट्रक (दोन एक्सल) ३२५, ४९० आणि मासिक पास १०८५० रपये टोल असेल. तीन एक्सल वाहनांसाठी ३५५, ५३५ आणि ११८७५ रुपये असे टोल आकारले जातील. जड बांधकाम यंत्रसामग्री/बहुएक्सल वाहनांना ५१० एकेरी, ७६५ दुहेरी आणि १७०२५ रुपयांचा मासिक पास असेल. मोठ्या वाहनांसाठी ६१० एकेरी, ९१५ दुहेरी आणि २०३७५ मासिक पासचे दर असतील.

या टोलनाक्यावर फास्टॅग नसलेल्या वाहनांकडून दुप्पट टोल आकरण्यात येणार आहे.

# दुहेरी हत्याकांडाने धुळे हादरले, भोंदूबाबाने घेतला दोघांचा बळी, पोलिसांनी बेड्या ठोकल्या

**धुळे/प्रतिनिधी :** धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यातून एक अत्यंत धक्कादायक बातमी समोर आली आहे. अंधश्रद्धा आणि भोंदूगिरीच्या विळख्यात अडकल्यामुळे एका विवाहित महिलेसह एका तरुणाला आपले आयुष्य गमवावे लागले. साक्री तालुक्यातील टेंभे-वर्धाने आणि उभरांडी शिवारात दोघांचे मृतदेह संशयास्पद रित्या आढळून आल्याने संपूर्ण धुळे जिल्हा हादरला आहे. भोंदूगिरी करणाऱ्या एका ढोंगी बाबानेच या दोघांचा बळी घेतल्याचा प्राथमिक संशय व्यक्त केला जात आहे.

साक्री तालुक्यातील टेंभे-वर्धाने आणि उभरांडी गावच्या शिवारात एका विवाहित महिलेचा आणि एका तरुणाचा मृतदेह स्थानिक नागरिकांना आढळून आला. एकाच वेळी दोन मृतदेह छिन्नविच्छिन्न अवस्थेत सापडल्याने परिसरात भीतीचे वातावरण पसरले. नागरिकांनी या घटनेची माहिती तातडीने स्थानिक पोलिसांना दिली.

भोंदूगिरीच्या नादी लागल्याने घातपात?

स्थानिक लोकांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत महिला आणि तरुण हे दोघेही गेल्या काही दिवसांपासून एका भोंदू बाबाच्या संपर्कात होते. काहीतरी कौटुंबिक अडचण अथवा इतर कुठल्यातरी अंधश्रद्धेच्या कारणातून ते या बाबाच्या नादी लागले असावेत, असा संशय व्यक्त होत आहे. याच भोंदूगिरीच्या प्रक्रियेदरम्यान काहीतरी अघोरी कृत्य करून किंवा वाद झाल्यानंतर त्यांची हत्या झाल्याचा संशय व्यक्त होत आहे.

घटनास्थळी दाखल झालेल्या पोलिसांनी मृतदेहांचा पंचनामा करून ते शवविच्छेदनासाठी पाठवले आहेत. या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली आणि तातडीने कारवाई करत एका संशयित भोंदू बाबाला ताब्यात घेतले आहे. त्याची सध्या कसून चौकशी सुरू असून, हत्येचे नेमके कारण काय होते? आणि यात आणखी कोणाचा सहभाग आहे का? याचा शोध पोलीस घेत आहेत.

# जनगणना, बौद्ध समाज आणि घटनात्मक हक्कांचे संरक्षण

भारत हा विविध धर्म, जाती, भाषा आणि संस्कृतींनी समृद्ध असा लोकशाहीप्रधान देश आहे. या देशाच्या प्रशासनाची, विकास योजनांची, सामाजिक न्यायाची आणि राजकीय प्रतिनिधित्वाची पायाभरणी जनगणनेवर आधारित असते. जनगणना ही केवळ लोकसंख्या मोजण्याची प्रक्रिया नसून ती समाजाच्या वर्तमान स्थितीचे आणि भविष्यातील धोरणांचे आरसे आहे. म्हणूनच प्रत्येक नागरिकाने जनगणनेत योग्य आणि अचूक माहिती देणे अत्यंत आवश्यक आहे. विशेषतः बौद्ध समाजासाठी ही बाब अधिक महत्त्वाची ठरते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथे लाखो अनुयायांसह बौद्ध धम्म स्वीकारला आणि भारतीय इतिहासात सामाजिक क्रांतीची नवी दिशा दिली. त्यांनी अस्पृश्यता, जातिभेद आणि सामाजिक अन्यायाविरुद्ध उभा केलेला हा लढा केवळ धर्मांतरापुरता मर्यादित नव्हता, तर तो स्वाभिमान, समानता आणि मानवी प्रतिष्ठेचा संघर्ष होता. धर्मांतरानंतर लाखो लोकांनी हिंदू धर्मातील जातिव्यवस्था नाकारून बौद्ध धम्माचा स्वीकार केला. आज आपण धर्माने बौद्ध आहोत, ही आपली अभिमानाची ओळख आहे.

परंतु जनगणना आणि शासकीय नोंदींमध्ये एक अत्यंत महत्त्वाची बाब लक्षात ठेवणे गरजेचे आहे. धर्म आणि जात या दोन वेगळ्या संकल्पना आहेत. अनेकदा अज्ञानामुळे किंवा चुकीच्या समजुतीमुळे काही लोक धर्माच्या आणि जातीच्या नोंदीत गोंधळ करतात. यामुळे भविष्यात गंभीर परिणाम होऊ शकतात.

जनगणनेच्या माहितीपत्रकात धर्माच्या ठिकाणी ''बौद्ध'' असे स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे. कारण आपली धार्मिक ओळख बौद्ध आहे. ही नोंद समाजाच्या धार्मिक अस्तित्वाची ओळख करून देते आणि बौद्ध समाजाची वास्तविक लोकसंख्या शासनापुढे स्पष्टपणे मांडते. बौद्ध समाजाची अचूक लोकसंख्या नोंदली गेल्यास समाजाच्या प्रश्नांकडे शासनाचे लक्ष अधिक प्रभावीपणे वेधले जाऊ शकते.

मात्र जातीच्या ठिकाणी आपल्या पूर्वजांची मूळ जात जसे महार, मातंग, चांभार, मांग, ढोर, भंगी, होलार, इत्यादी योग्य प्रकारे लिहिणे अत्यंत आवश्यक आहे. कारण संविधानानुसार अनुसूचित जातीसाठी असलेले राजकीय आरक्षण, शैक्षणिक सवलती, नोकरीतील आरक्षण, निवडणूक प्रतिनिधित्व आणि इतर शासकीय लाभ हे त्या मूळ सामाजिक श्रेणीच्या आधारावरच लागू होतात.

जर जातीच्या ठिकाणी ''बौद्ध'' असे लिहिले गेले, तर ती प्रशासकीय दृष्ट्या चुकीची नोंद ठरते. ''बौद्ध'' हा धर्म आहे, जात नाही. अशा चुकीच्या नोंदीमुळे अनुसूचित जातीच्या अधिकारांवर प्रश्नचिन्ह निर्माण होऊ शकते. भविष्यात शिष्यवृत्ती, नोकरीतील आरक्षण, राजकीय आरक्षण, जात प्रमाणपत्र, निवडणूक आरक्षण यामध्ये अडचणी निर्माण होऊ शकतात. ही चूक एका व्यक्तीपुरती मर्यादित राहत नाही, तर संपूर्ण समाजाच्या प्रतिनिधित्वावर परिणाम करू शकते.

आज अनेक ठिकाणी सामाजिक आणि राजकीय आरक्षण कमी करण्याचे प्रयत्न सुरू असल्याची चर्चा समाजात होत असते. अशा परिस्थितीत आपल्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी जनगणनेतील योग्य नोंद ही अत्यंत महत्त्वाची शस्त्र ठरते. आरक्षण हे दयेचे नव्हे, तर घटनात्मक हक्काचे प्रतीक आहे. हे हक्क टिकवण्यासाठी योग्य माहिती नोंदविणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.

विशेषतः ग्रामीण भागात अजूनही या विषयाबाबत पुरेशी जागरूकता नाही. अनेक कुटुंबांना धर्म आणि जात यातील फरक स्पष्टपणे समजलेला नसतो. त्यामुळे समाजातील शिक्षक, पत्रकार, वकील, सामाजिक कार्यकर्ते, धम्म उपासक, भन्ते, युवक आणि महिला यांनी याबाबत जनजागृती करणे आवश्यक आहे. बुद्धविहार, सामाजिक सभा, धार्मिक कार्यक्रम, जयंती उत्सव, वर्तमानपत्रे, सोशल मीडिया आणि सार्वजनिक कार्यक्रमांच्या माध्यमातून हा संदेश प्रत्येक घरापर्यंत पोहोचवला पाहिजे.

''धर्मबौद्ध, जातपूर्वजांची मूळ जात'' हा संदेश फक्त घोषवाक्य नसून तो आपल्या पुढील पिढ्यांच्या भविष्याचा पाया आहे. आपल्या मुलांचे शिक्षण, रोजगार, राजकीय प्रतिनिधित्व आणि सामाजिक न्याय यांचा संबंध या एका योग्य नोंदीशी जोडलेला आहे.

आपण जर आज सजग राहिलो नाही, तर उद्या आपल्या हक्कांवर संकट येऊ शकते. त्यामुळे प्रत्येक बौद्ध कुटुंबाने जनगणनेच्या वेळी ही बाब गांभीर्याने घ्यावी. गणनाकर्ता घरी आल्यावर योग्य माहिती देणे, शंका असल्यास जाणकारांकडून मार्गदर्शन घेणे आणि इतरांनाही याबाबत जागरूक करणे ही काळाची गरज आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला संदेश स्पष्ट होता. ''शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा.'' आज त्या संघर्षाचा एक भाग म्हणजे आपली घटनात्मक ओळख सुरक्षित ठेवणे. जनगणनेतील योग्य नोंद हीच त्या संघर्षाची आधुनिक दिशा आहे.

चला, समाजाला जागृत करूया धर्माच्या ठिकाणी बौद्ध जातीच्या ठिकाणी पूर्वजांची मूळ जात हीच योग्य नोंद,हीच सामाजिक सुरक्षितता, हीच राजकीय संरक्षणाची हमी.

राहुल गायकवाड, लातूर
मोबाईल. ९५९५७५१३७३
ॲड. महेंद्रकुमार इंगळे
मो. ९८९०२२७३४०
डॉ. रमेश ओव्हाळ, बीड
मो. ७७९६११००११
सदानंद कापूरे, लातूर
मो. ९८६०००६६०५
प्रा.अण्णाराव कांबळे, धाराशिव
मो. ९४२०७७१०५३
राजहंस कांबळे, लातूर
मोबा.९९२३३३०४८५
डॉ. लालासाहेब बनसोडे
मोबा.९४२२६२९०५२
पवन कांबळे, सेलूकर
मो.९९२३२८८७२९

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.